RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६८

दि. ०३ जुलै २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# शेती सुधारणा आणि शेतघरासाठी गौण खनिजांच्या वापरावर आता रॉयल्टी आणि दंडाची कारवाई नाही!

**लातूर/प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता नैसर्गिकरीत्या टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शेती सुधारणा, शेतरस्त्यांची दुरुस्ती, विहीर किंवा शेतघर आणि जनावरांचा गोठा बांधण्यासाठी लागणाऱ्या गाळ, माती आणि मुरुमासारख्या गौण खनिजांच्या वापरावर आकारले जाणारे स्वामित्वधन (रॉयल्टी) पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, या कामांसाठी गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर किंवा बैलगाड्यांवर यापुढे कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने आज निर्गमित केला आहे. मात्र, माती किंवा मुरुमाचा वापर



जर व्यावसायिक किंवा वाणिज्यिक उद्देशासाठी केला जात असेल, तर त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई सुरूच राहील.

गेल्या काही वर्षांत सततचा दुष्काळ, हवामान बदल आणि रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेतजमिनीची सुपीकता खालावत चालली आहे. दुसरीकडे, जलसंपदा व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील गावतळी, शेततळी, पाझर तलाव आणि महसुली नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे त्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे. या जलकुंभांमधील गाळ अत्यंत पोषक आणि सुपीक असतो. हा गाळ शेतकऱ्यांना मोफत मिळाल्यास जमिनीची सुपीकता वाढेल, रासायनिक खतांचा खर्च कमी होईल आणि जलकुंभांची साठवण क्षमता वाढून भूजल पातळीत सुधारणा होईल, या उद्देशाने महसूल व वन विभागाने हा निर्णय घेतला आहे.

**स्वामित्वधनातून (रॉयल्टी) सूट**

शेती सुधारणा, शेतरस्ते दुरुस्ती, पावसाळ्यात झालेले खड्डे/चिखल बुजवणे, विहीर, शेतघर आणि जनावरांचा गोठा या कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या गाळ, माती आणि मुरुमासाठी आता कोणतेही स्वामित्वधन द्यावे लागणार नाही. हा वापर व्यावसायिक स्वरूपाचा नसल्यामुळे, रीतसर परवानगी घेऊन ट्रॅक्टर किंवा बैलगाडीद्वारे वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६९ मधील तरतुदींनुसार कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. पोलीस आणि तहसीलदार प्रशासनाला अशा वाहनांवर कारवाई न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**सक्षम अधिकाऱ्यांची ना-हरकत, तलाठी यांची परवानगी आवश्यक**

या गौण खनिजांची वाहतूक करण्यासाठी संबंधित क्षेत्राच्या तलाठ्यांची (ग्राम महसूल अधिकारी) लेखी परवानगी घेणे बंधनकारक असेल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तलाठ्यांना १५ दिवसांच्या आत छाननी करून ही परवानगी देणे आवश्यक राहील. गावातील रहिवासी व शेतकऱ्यांना जलसंधारण, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीच्या मालकीचे तलाव किंवा महसुली नाल्यांमधून माती, दगड, खडक किंवा मुरूम काढता येईल, परंतु यासाठी संबंधित विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

## लातूरला विभागीय कार्यालय मंजूर करा; पावसाळी अधिवेशनात आमदार अभिमन्यू पवार यांची लक्षवेधी



**मुंबई/लातूर । प्रतिनिधी:** औसा मतदारसंघाचे अभिमन्यू पवार यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे लातूर येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्याची जोरदार मागणी केली.आमदार पवार म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील नागरिकांना विविध प्रशासकीय कामांसाठी वारंवार छत्रपती संभाजीनगर येथे ३५० किलोमीटर जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. लातूर येथे विभागीय कार्यालय स्थापन झाल्यास मराठवाड्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी लातूर येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती, याचीही आठवण करून दिली. मात्र, विविध कारणांमुळे हा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या लातूर शहरात विविध शासकीय विभागांची सुमारे २५ विभागीय कार्यालये कार्यरत असून, आवश्यक प्रशासकीय सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे स्वतंत्र विभागीय कार्यालयासाठी लातूर हे सर्वार्थाने सक्षम व योग्य ठिकाण असल्याचा दावा आमदार पवार यांनी केला.लातूरसह परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी राज्य शासनाने तातडीने लातूर येथे विभागीय कार्यालय मंजूर करून कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी पावसाळी अधिवेशनात केली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, पात्र थकीत कर्जखात्यांवर व्याज न आकारण्याचे जिल्हा बँकांना आदेश

**लातूर/प्रतिनिधी:** राज्य शासनाच्या सहकार विभागाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ अंतर्गत एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता योजनेस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्ज खात्यांवर ०१ एप्रिल २०२६ ते योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी व्याज आकारणी करू नये, असे आदेश शासनाने राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिले आहेत.

राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' योजना जाहीर केली आहे. या अंतर्गत ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समजोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कर्जमुक्तीचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

## रत्नागिरीत दोन बसेसची समोरासमोर धडक; १५ विद्यार्थी जखमी

**रत्नागिरी/प्रतिनिधी:** रत्नागिरीतील मिरजोळे-उक्षी मार्गावर गुरुवारी सकाळी दोन बसेसची समोरासमोर जोरदार धडक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या अपघातात पटवर्धन हायस्कूल आणि महाविद्यालयातील १५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एका बस चालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. गुरुवारी सकाळी पावणेसात ते सातच्या सुमारास हा अपघात फणसवळे (पवार कोंड) परिसरात घडला.

## मनपातील विभागप्रमुख गोपी साठे यांची मालमत्ता सहव्यवस्थापकपदी नियुक्ती; वारंवार बदल्यांबाबत चर्चा

**लातूर/प्रतिनिधी:** गोपी साठे यांची प्रशासकीय कारणास्तव लातूर शहर महानगरपालिका येथे अतिक्रमण विभाग प्रमुख पदावरून मालमत्ता व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रशासकीय



आदेशानंतर मनपा वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.गोपी साठे यांनी गेल्या जवळपास १५ ते १६ वर्षांच्या सेवाकाळात पाणीपुरवठा व बांधकाम विभाग वगळता महानगरपालिकेतील अनेक विभागांमध्ये जबाबदारी सांभाळली आहे. विविध विभागांमध्ये त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे कर्मचारी वर्तुळातही चर्चा रंगू लागली आहे.प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेल्या या बदलीमागील नेमकी कारणे अधिकृतरीत्या स्पष्ट करण्यात आलेली नसली, तरी एका अधिकाऱ्याची सातत्याने विभागनिहाय बदली होत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पाणीपुरवठा व बांधकाम विभाग वगळता जवळपास सर्वच विभागांमध्ये त्यांनी काम केले असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, या बदल्यांमुळे मनपाच्या प्रशासकीय कार्यपद्धतीवरही चर्चा सुरू असून, वारंवार विभाग बदलण्यामागे कोणते निकष अवलंबले जातात, याबाबत नागरिक आणि कर्मचारी यांच्यात उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

## लातूर मनपा आयुक्त राहुल कुलकर्णी यांचा पत्रकारांकडून सत्कार; पुढील वाटचालीस शुभेच्छा



**लातूर/प्रतिनिधी:**सन २०२० बॅचचे आयएएस अधिकारी राहुल कुलकर्णी यांनी गुरुवार, दि. २ जुलै रोजी लातूर शहर महानगरपालिका येथे आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी पोलीस क्राईम न्यूज चॅनलचे संपादक डी. एल. वाघमारे, दैनिक महावृत्तचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ लातूर जिल्हा शाखेचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, दैनिक न्याय टाइम्सचे संपादक बालकिशन सोनी तसेच अन्य पत्रकारांनी नवनियुक्त आयुक्त राहुल कुलकर्णी यांची भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व पदभार स्वीकारल्याबद्दल हार्दिक अभिनंदन केले.

यावेळी उपस्थित पत्रकारांनी राहुल कुलकर्णी यांना लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासनासाठी तसेच प्रभावी कामकाजासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. नवनियुक्त आयुक्तांच्या नेतृत्वाखाली लातूर शहर महानगरपालिकेच्या विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वासही उपस्थितांनी व्यक्त केला.

## तृतीयपंथीय विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाची विशेष शिष्यवृत्ती आणि स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना

**लातूर/प्रतिनिधी:**भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या वतीने तृतीयपंथीय व्यक्तींच्या कल्याणासाठी 'SMILE' (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise) या केंद्रीय क्षेत्र योजनेअंतर्गत विशेष उपयोजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना केंद्र शासनाच्या https://transgender.dosje.gov.in/ या राष्ट्रीय पोर्टलवरून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शासनमान्य किंवा खासगी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये इयत्ता नववी ते पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या व भारताचे नागरिक असलेल्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष १३ हजार ५०० रुपये इतकी मॅट्रिकपूर्व (प्रि-मॅट्रिक) व मॅट्रिकोत्तर (पोस्ट-मॅट्रिक) शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी केलेले तृतीयपंथीय ओळखपत्र असणे आणि त्यांचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक आहे. ही शिष्यवृत्ती मर्यादित स्वरूपात असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणांच्या आधारे केली जाईल, तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देय राहणार नाही; त्यामुळे पात्र उमेदवारांनी राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा.

या शैक्षणिक सुविधेशोबतच, राज्यातील तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात किमान १० वर्षे वास्तव्य असलेल्या १८ ते ५० वयोगटातील व्यवसाय करण्यास सक्षम अशा अप्रशिक्षित किंवा प्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन आवश्यक साधन संच (टूल किट) व कर्जाची सुविधा दिली जाणार आहे. योजनेअंतर्गत उमेदवारांना २५ हजार रुपयांपर्यंत लघु कर्ज, ५० हजार रुपयांपर्यंत मध्यम कर्ज आणि २ लाख रुपयांपर्यंत दीर्घ कर्ज यांपैकी कोणतेही एक कर्ज अनुज्ञेय राहील, ज्यामध्ये लाभार्थ्याचा हिस्सा ५ टक्के, शासन अनुदान ४५ टक्के आणि उर्वरित ५० टक्के रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल. तसेच या योजनेअंतर्गत नियमित कर्ज फेडणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सूट (रिबेट) दिली जाणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी व्यवसायासाठीचा परवाना, यंत्रसामुग्रीचे कोटेशन किंवा बिले, जागेचा ७/१२ उतारा अथवा भाडेकरारनामा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र यांसह शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्ह्याच्या समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांकडे सादर करणे आवश्यक आहे. या योजनांच्या अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## स्टोन क्रशरवर काम करणाऱ्या मजुरांवर काळाचा घाला : दगडी खाणीत खडक कोसळून ७ ठार

बंगळुरू : स्टोन क्रशरवर काम करणाऱ्या मजुरांवर मोठा खडक कोसळून सात मजुरांचा मृत्यू झाल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना बंगळुरू दक्षिण जिल्ह्यातील मडापट्टना इथं आज पहाटेच्या सुमारास घडली. मृत मजूर बिहार आणि आसाममधील असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. खडकाखाली आणखी काही कामगार अडकल्याची भीती असल्यानं बचावकार्य सुरू आहे.

दगडी खाणीत कोसळला मोठा खडक : गुरुवारी बंगळुरू दक्षिण जिल्ह्यातील मडापट्टना इथल्या दगडी खाणीत मजूर काम करत होते. यावेळी दगड फोडताना या मजुरांवर मोठ्या प्रमाणात खडक कोसळला. त्यामुळे मजूर जागीच दबल्या गेले. त्यामुळे सात मजुरांचा जागीच मृत्यू झाला आहे. या खाणीत काम करण्यासाठी कंत्राटदारानं आसाम आणि बिहारमधून कामगार आणल्याची माहिती स्थानिकांनी दिली. खडकाखाली अद्यापही मजूर अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# मनपा आयुक्तपदी राहुल कुलकर्णी रुजू

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी (दि. २ जुलै ) पदभार स्वीकारला. यावेळी महापौरांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.





अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील मूळ रहिवासी असणारे राहुल कुलकर्णी हे १९९७ मध्ये कक्ष अधिकारी म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले. आतापर्यंत त्यांनी सहकार,नगर विकास, सामान्य प्रशासन विभाग, वैद्यकीय शिक्षण, महसूल व वनीकरण तसेच गृह विभागात वेगवेगळ्या पदावर कार्य केलेले आहे. विशेष म्हणजे २०२० मध्ये सरळ सेवा परीक्षेद्वारे ते भारतीय प्रशासन सेवेत रुजू झाले.शासनाने नुकतीच त्यांची लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. गुरुवारी त्यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले,विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवकांनी त्यांचे स्वागत केले. अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी प्रशासनाच्या वतीने आयुक्तांचे स्वागत करून कामकाजाची माहिती दिली.

## संपादकीय...

### इथेनॉल मिश्रणाचा पेच

भारताने पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे लक्ष्य पाच वर्षे आधीच गाठले. भारताची इथेनॉल उत्पादन क्षमता गरजेपेक्षा दुप्पट झाली असली, तरी जुन्या वाहनांचे मायलेज आणि इंजिनच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. भारतासाठी इंधन सुरक्षा हा आर्थिक आणि भूराजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत उत्पादित इंधनाचा वापर वाढवण्यासाठी भारत गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणावर भर देत आहे. इथेनॉल हे ऊस, मका किंवा इतर पिकांपासून तयार होणारे अल्कोहोल आधारित इंधन आहे, जे पेट्रोलमध्ये मिसळून वाहनांसाठी वापरले जाऊ शकते. २०३० पर्यंत ई-२० म्हणजे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण साध्य करण्याची योजना होती. भारताने हे उद्दिष्ट तब्बल पाच वर्षे आधीच गाठले असून ई-२० आज राष्ट्रीय मानक बनले आहे. ई-२५, ई-८५ आणि ई-१०० हे पुढील टप्पे गाठण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे ग्राहक, वाहन उत्पादक आणि धोरणकर्त्यांसमोर नवीन प्रश्न उभे राहिले आहेत. ई-२० नियमांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी भारताला वर्षाला सुमारे १० ते ११ अब्ज लिटर इथेनॉलची गरज आहे; मात्र नोव्हेंबर २०२५ मध्येच देशाची उत्पादन क्षमता २० अब्ज लिटरवर पोहोचली. २०२६-२७ या आर्थिक वर्षात त्यात आणखी १५ टक्के वाढ अपेक्षित आहे. सध्याच्या गरजेपेक्षा ही क्षमता दुप्पट असल्याने अनेक कारखाने अवघ्या २५-३० टक्के क्षमतेवर चालत आहेत. त्यामुळे प्रश्न पुरवठा वाढवण्याचा नसून अतिरिक्त क्षमतेसाठी मागणी सुनिश्र्चित करण्याचा आहे. सरकारी कर्ज सवलतींमुळे खासगी क्षेत्राकडून या उद्योगात ४०,००० कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक झाली; मात्र प्रकल्प बंद राहिल्यास खर्च वाढून ही गुंतवणूक धोक्यात येऊ शकते. साखरेच्या अस्थिर बाजारापेक्षा इथेनॉलला हमीभाव मिळत असल्याने कंपन्यांनी इथे गुंतवणूक वाढवली आहे. परिणामी, इथेनॉलचा गरजेपेक्षा जास्त पुरवठा होत आहे. त्यामुळे इथेनॉल मिश्रण या अतिरिक्त उत्पादनाला सामावून घेण्याचा एक मार्ग बनले आहे. इथेनॉलचे उत्पादन वाढवण्यासाठी ऊस, मका आणि तांदळाचे अधिक उत्पादन लागेल. यासाठी युरिया, डायअमोनियम फॉस्फेट आणि पोटॅशसारख्या खतांची मागणी वाढेल. ही खते स्वतः आयात केलेल्या नैसर्गिक वायूवर अवलंबून असतात. या पिकांना जास्त पाठबळ दिल्यास शेतकरी तेलबिया आणि डाळींचे क्षेत्र कमी करण्यास प्रवृत्त होऊ शकतात. इथेनॉलच्या मोहापायी डाळी, तेलबिया आणि पशुखाद्याचा तुटवडा निर्माण होऊन 'अन्न की इंधन' असा पेच उभा ठाकू शकतो. इथेनॉलमुळे देशाचे एकूण आयात-अवलंबित्व कमी होणार नाही. ते केवळ खते, नैसर्गिक वायू आणि खाद्यतेलांकडे वळेल. पर्यावरणीय गणित हा आणखी एक गंभीर पेच आहे. एक लिटर इथेनॉलनिर्मितीसाठी उसाला २८६० लिटर, मक्याला ४०९३ लिटर, तर तांदळाला तब्बल १० हजार ७९० लिटर पाणी लागते. सध्या जवळपास ५०० कारखाने सुरू असून धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा वाटा वाढतो आहे, ज्यामुळे पाण्याची गरजही वाढते आहे. मक्याचा उत्पादन खर्च वाढतो आहे; पण खरेदी दर स्थिर असल्याने उत्पादकांना नुकसान होत आहे. अपुरी वितरण यंत्रणा, जनजागृतीचा अभाव आणि फ्लेक्स इंधन म्हणजे विविध प्रमाणातील पेट्रोल-इथेनॉल मिश्रणांवर चालू शकणाऱ्या वाहनांची महागडी किंमत यांमुळे अतिरिक्त अडथळे निर्माण होतील. सरकारने २२ ते ३० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलला केंद्रीय अबकारी करातून सवलत देत ते ई-२० च्या पातळीवर आणले, तसेच मोटार वाहन नियमांखाली ई-८५ आणि ई-१०० ला अधिकृत मान्यता देण्यासाठी हालचाली सुरू केल्या. 'ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्स'ने उच्च मिश्रणांचे तांत्रिक निकष जाहीर केले. सरकार ई-२२ ते ई-३० साठी मानके तयार करत आहे. ई-२५ वाहनांच्या चाचण्याही सुरू झाल्या. केंद्र सरकारने ई-१०० लाही कायदेशीर मान्यता दिली. ई-२० नंतरच्या कोणत्याही उच्च मिश्रणाची अंमलबजावणी पूर्ण चाचण्यांनंतरच केली जाईल. वाहन उत्पादक व इंधन पुरवठादारांना पुरेसा वेळ मिळणे अपेक्षित आहे. २०१२ ते मार्च २०२३ मधील बहुतांश वाहने ई-१० साठी बनली आहेत, तर एप्रिल २०२३ नंतरच्या वाहनांचे भाग ई-२० ला पूरक आहेत; मात्र केवळ एप्रिल २०२५ नंतर विकली गेलेली वाहनेच पूर्णपणे ई-२० सक्षम आहेत. त्यामुळे २०२५ पूर्वीच्या मोठ्या वाहनसंख्येसाठी सध्याचे इंधन मिश्रण जोखमीचे ठरू शकते. शिवाय, पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलची ऊर्जा क्षमता कमी असल्याने वाहनाचे मायलेजही घटते. नीती आयोगाने ई-२० मुळे मायलेजमध्ये १-२ टक्क्यांची घसरण वर्तवली होती; पण प्रत्यक्षात मात्र मायलेज ५ ते १२ टक्क्यांपर्यंत कमी झाल्याच्या तक्रारी आहेत. अर्थात, जुन्या वाहनांचे मायलेज आणखी कमी आहे. इथेनॉल उशिरा पेटत असल्याने थंडीत गाड्या सुरू होण्यास अडचण येत आहे. ई-१० ते ई-२० पेक्षा ई-२० कडून ई-२५ कडे जाताना अडचणी जास्त वाढतील. दुसरे म्हणजे, पंपांवर ई-१०, ई-२० किंवा शुद्ध पेट्रोल निवडण्याची सोय नसल्याने नुकसानीचा भार वाहनधारकांवर पडतो. ई-२० पुन्हा बदलावे लागल्यास वाढीव खर्चाचा भार ग्राहकांवर पडू शकतो. त्यामुळे उत्पादकांनी धोरणात्मक स्पष्टता, देशभरात समान इंधन मानके आणि तेल कंपन्यांशी समन्वयाची मागणी केली आहे. कारण, एकाच वेळी अनेक प्रकारचे इंधन पुरवणे कंपन्यांना कठीण जाते. ऊस उत्पादक राज्यांमधील राजकीय पैलू लक्षात घेता, वाहन उद्योग आणि साखर लॉबीने हे मिश्रण टप्प्याटप्प्याने वाढवण्याची मागणी केली आहे. नीती आयोगाच्या मार्गदर्शक समितीनुसार, प्रत्येक नवीन मिश्रणासाठी इंजिनमध्ये वारंवार बदल करण्यापेक्षा, थेट ई-२० आणि त्याहून अधिक मिश्रणावर चालणाऱ्या फ्लेक्स इंधन वाहनांनाच प्रोत्साहन देणे अधिक सोयीचे ठरेल. तेल आयातीचा खर्च कमी करण्यासाठी देशातच तयार होणारे इथेनॉल हा एक उत्तम पर्याय मानला जातो. दुसरे कारण शेतीशी जोडलेले असून महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशमधील शेतकरी संघटनांनी यासाठी खूप दबाव आणले आहे. इथेनॉलची मागणी वाढल्याने ऊस व इतर पिकांसाठी मोठी बाजारपेठ मिळते. यामुळे शेतीतील अतिरिक्त उत्पादनाचा वापर होतो आणि कारखान्यांची उत्पादन क्षमताही पूर्णपणे उपयोगात आणता येते. सुसंघटित आणि परिपक्व ऊस इथेनॉल उद्योगाच्या जोरावर ब्राझील अनेक दशकांपासून २७ ते ३० टक्के मिश्रणाचे यशस्वी जागतिक मॉडेल ठरला आहे. १९७० च्या तेल संकटानंतर सुरू झालेल्या या प्रवासात ब्राझीलने देशव्यापी पायाभूत सुविधा, फ्लेक्स इंधन वाहने आणि मोठी ग्राहक जागृती केली. आज तिथे नवीन कार विक्रीत फ्लेक्स वाहनांचा वाटा ९० टक्क्यांपेक्षा जास्त असून ग्राहकांना विविध इथेनॉल मिश्रणांमधून निवडीचे स्वातंत्र्य उपलब्ध आहे. ही निवडच ब्राझीलच्या यशाचा पाया आहे. ब्राझीलने हे धोरण जुन्या वाहनधारकांचे नुकसान टाळत टप्प्याटप्प्याने राबवले. भारतालाही उच्च मिश्रणासाठी लोकांचा पाठिंबा हवा असल्यास हाच धडा गिरवावा लागेल. इतरत्र मक्यापासून उत्पादनाद्वारे अमेरिकेने देशव्यापी ई-१० मिश्रणाचा कार्यक्रम उभारला आहे. फिलिपिन्समध्ये २०१२ पासून ई-१० अनिवार्य आहे, तर व्हिएतनामने जून २०२६ पासून देशव्यापी ई-१० अंमलात आणले. ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य, अनुकूल किंमत धोरणे, फ्लेक्स फ्युएल वाहनांचा प्रसार, पायाभूत सुविधांमध्ये वाढ आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी यांची परिणामकारक सांगड घालण्यात भारताचे यश दडलेले आहे.

# अमृतची आता हरित उर्जा क्षेत्राकडे वाटचाल : अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन



हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी Go Green India आणि सस्टेनेबल मोबिलिटी ही संकल्पना मांडली आहे. त्या दिशेने सक्रिय कार्य करण्याचे ठरवून, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या माध्यमातून राज्यभरात ईव्ही (Electric Vehicle) चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. देशामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झपाट्याने वाढत असून आगामी काळात ईव्ही चार्जिंग स्टेशनचे मोठे जाळे उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. आता पेट्रोल पंप प्रमाणे अनेक ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनची नितांत गरज आहे. महाराष्ट्रामध्येही या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या संधींचा लाभ राज्यातील युवकांना मिळावा यासाठी अमृतने हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

**ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायातील संधी**

ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही संबंधित तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल व्यवसाय तसेच ग्रामीण भागामध्ये चार्जिंग हब उभारणी अशा विविध क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या उद्योग क्षेत्रांपैकी एक ठरणार असल्याने प्रशिक्षित उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळणार आहे.

**उपक्रमाचे वैशिष्ट्य**

अमृतच्या या विशेष उपक्रमांतर्गत सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. या क्षेत्रातील भारतीय स्वदेशी कंपन्या आणि तज्ञ मार्गदर्शक यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी केला जाणार आहे. याशिवाय अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभही पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे.

**पात्रता व अटी**

या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट (SHG), एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, ग्रामीण उद्योजक तसेच स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणारे नागरिक पात्र राहतील. अमृतच्या वैयक्तिक व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या पात्रता व अटी लागू राहतील.

**कोणत्या क्षेत्रात रोजगार व करिअरच्या संधी?**

ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायाबरोबरच ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग नेटवर्क ऑपरेशन, इलेक्ट्रिकल देखभाल, तांत्रिक सेवा, ग्रीन एनर्जी प्रकल्प, ईव्ही उपकरण विक्री व सेवा, तसेच उद्योजकता विकास या क्षेत्रांमध्ये रोजगार व करिअरच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. ग्रामीण भागातील युवकांसाठीही हा व्यवसाय उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकतो.

**स्वयंरोजगारासाठी विशेष सहाय्य**

स्वतःचा अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना अमृतकडून आवश्यक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला, मदत तसेच अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ दिला जाईल. त्यामुळे नवोदित उद्योजकांना व्यवसाय उभारण्यासाठी विशेष मदत मिळणार आहे.

**कुठे आणि कसा अर्ज करायचा?**

अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अमृत संस्थेच्या mahaamrut.org.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन, 'योजना' या विभागात, विशेष योजना या मेनू खाली एV charging Station Partner मध्ये ऑनलाइन अर्ज करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्यातील अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा. वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा व्यवस्थापकांचे संपर्क क्रमांक आणि कार्यालयाचा पत्ता व इतर तपशील दिलेला आहे.

**हरित महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा उपक्रम**

ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार असून राज्यातील युवक, महिला आणि ग्रामीण उद्योजकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

**ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायामध्ये भविष्यातील संधी**

चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन, व्यवस्थापन, उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, तांत्रिक सेवा, फ्रँचायझी व्यवसाय आणि ग्रामीण चार्जिंग हब उभारणी अशा विविध संधी उपलब्ध आहेत.

**प्रशिक्षण/ मार्गदर्शनाचे स्वरूप**

ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक मार्गदर्शन, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, तसेच पूरक व्यवसाय करण्यासंदर्भात मार्गदर्शन दिले जाईल.

उपक्रमांतर्गत आर्थिक सहाय्याची सुविधा होय. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांना अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ उपलब्ध होऊ शकेल.

**रोजगार व करिअरच्या उपलब्ध संधी**

ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग नेटवर्क ऑपरेशन, इलेक्ट्रिकल देखभाल, ग्रीन एनर्जी प्रकल्प, ईव्ही उपकरण विक्री व सेवा तसेच उद्योजकता विकास या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

**ग्रामीण भागातील युवकांना फायदेशीर**

ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी व ईव्ही सेवा केंद्रांच्या माध्यमातून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील.

**स्वयंरोजगार सुरू करू इच्छिणाऱ्यांना सहाय्य**

व्यवसाय उभारणीसाठी मार्गदर्शन, तांत्रिक सल्ला, व्यवसाय नियोजन मदत आणि वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ दिला जाईल.

**अर्ज करण्याची प्रक्रिया**

इच्छुक उमेदवारांनी अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन 'योजना' विभागातील EV Charging Station पर्यायामध्ये ऑनलाइन अर्ज करावा.

**महाराष्ट्राला होणारा फायदा**


अमृतच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल, हरित ऊर्जा वापर वाढेल आणि युवक, महिला व ग्रामीण उद्योजकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. भविष्यात पर्यावरण रक्षण हा मुद्दा अतिशय गंभीर होणार आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने आपण त्याचे दुष्परिणाम बघत आहोत. अमृतने पर्यावरण रक्षणाच्या याच सामाजिक जबाबदारीतून हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे पर्यावरणाचे रक्षण होणार आहेच त्याच बरोबर स्वयंरोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध होणार आहेत.

-----------------

**अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर (७३९१०६५४७०) पहिला मजला, पित्रछया बिल्डिंग, मयुरेश्वर अपार्टमेंट, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर तालुका, जिल्हा लातूर-४१३५१२ यांच्याशी संपर्क साधावा.**

# श्रद्धा, सत्ता आणि मौन : राम मंदिरातील गैरव्यवहार व पेपरफुटीवर पंतप्रधान गप्प का?

देशाच्या राजकारणात काही विषय असे असतात की, त्यांच्यावर सरकारची भूमिका जितकी महत्त्वाची असते, तितकेच महत्त्व त्या विषयावरचे सरकारचे मौनही असते. कारण लोकशाहीत शांतता म्हणजे नेहमीच समाधान नसते तर अनेकदा ती उत्तरदायित्वापासून दूर राहण्याची भूमिका असते. आज देशासमोर असेच दोन गंभीर प्रश्न उभे आहेत. एक अयोध्येतील राम मंदिराशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप आणि दुसरे सातत्याने घडणाऱ्या विविध भरती व स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटीच्या घटना. या दोन्ही विषयांनी देशभरात चर्चा निर्माण केली आहे. मात्र या प्रश्नांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मौन अधिकच चर्चेचा विषय ठरत आहे. राम मंदिर हा केवळ दगड-विटांचा प्रकल्प नाही, तो कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर उभे राहिलेले हे मंदिर राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक म्हणून मांडले गेले. त्यामुळे त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शंका दूर करणारी स्पष्ट भूमिका अपेक्षित असणे स्वाभाविक आहे. विविध माध्यमांमध्ये मंदिर परिसरातील कामे, जमीन व्यवहार किंवा निधीच्या वापराबाबत वेळोवेळी आरोप समोर आले. हे आरोप सिद्ध झाले आहेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु आरोप झाले असतील तर त्यांची निष्पक्ष चौकशी व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे.




श्रद्धेच्या नावाने जनतेकडून विश्वास मागायचा आणि त्याच श्रद्धेशी संबंधित प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक किंवा धर्मविरोधी ठरवायचे, ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. कारण श्रद्धेला प्रश्न विचारले जात नाहीत, पण सार्वजनिक निधी, संस्थात्मक निर्णय आणि प्रशासनाला नक्कीच विचारले जाऊ शकते. राम मंदिर हे कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नसून देशाच्या भावविश्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याच्या व्यवस्थापनातील पारदर्शकता ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. दुसरीकडे, पेपरफुटीच्या घटनांनी तर देशातील लाखो तरुणांचे भविष्य अक्षरशः वेठीस धरले आहे. मागील काही वर्षांत विविध राज्यांतील तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांनी गाजल्या. विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, आर्थिक अडचणींवर मात करतात, कुटुंबाच्या अपेक्षा सांभाळतात पण परीक्षेच्या आदल्या दिवशी किंवा परीक्षेनंतर पेपरफुटी झाल्याचे समोर येते आणि त्यांच्या परिश्रमांवर एका क्षणात पाणी फिरते. पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी नाही तर ती देशाच्या गुणवत्ताधारित व्यवस्थेवरचा हल्ला आहे. मेहनती विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचवणारी आणि भ्रष्ट मार्ग स्वीकारणाऱ्यांना प्रोत्साहन देणारी ही प्रवृत्ती आहे. जेव्हा वारंवार अशा घटना घडतात, तेव्हा प्रश्न फक्त गुन्हेगारांचा राहत नाही तर प्रश्न व्यवस्थेच्या अपयशाचा बनतो.

केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा कायदा लागू केला, कठोर शिक्षेच्या तरतुदी केल्या. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी कायदे पुरेसे नसतात, त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते. जर पेपरफुटीची मालिका सुरूच राहिली, तर कायद्याची भीती कुठे आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. या दोन्ही विषयांना जोडणारा समान धागा म्हणजे 'विश्वास'. राम मंदिरावरील विश्वास आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास. समाजाचा विश्वास तुटू लागला, तर कोणतीही व्यवस्था मजबूत राहू शकत नाही. म्हणूनच या प्रश्नांवर सरकारने केवळ प्रशासकीय नव्हे, तर नैतिक नेतृत्वही दाखवणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील सर्वाधिक प्रभावशाली राजकीय नेतृत्व मानले जातात. एखाद्या यशस्वी मोहिमेचे श्रेय स्वीकारताना त्यांचे नेतृत्व पुढे येते. मग गंभीर आरोप, व्यवस्थेतील त्रुटी किंवा जनतेच्या अस्वस्थतेच्या प्रश्नांवरही त्याच नेतृत्वाने स्पष्ट भूमिका मांडणे अपेक्षित नाही का? लोकशाहीत नेतृत्वाची खरी कसोटी संकटाच्या वेळी होते, यशाच्या वेळी नव्हे. हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रश्न विचारणे म्हणजे सरकारविरोधी भूमिका नव्हे. उलट, सत्तेला प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद आहे.

कोणत्याही सरकारला जनतेने अमर्याद अधिकार दिलेले नसतात तर जनतेने त्यांना उत्तरदायित्वाची जबाबदारी दिलेली असते. त्यामुळे ''पंतप्रधान गप्प का?'' हा प्रश्न व्यक्तीविरोधी नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा प्रश्न आहे. आज देशातील तरुण रोजगार, परीक्षा आणि संधी याबाबत अस्वस्थ आहेत. दुसरीकडे धार्मिक श्रद्धेशी संबंधित संस्थांमध्ये पारदर्शकतेची अपेक्षा वाढत आहे. या दोन्ही भावना दुर्लक्षित करणे योग्य ठरणार नाही. सरकारने सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि पारदर्शक माहिती जनतेसमोर ठेवण्याची तयारी दाखवली पाहिजे. त्यामुळे अफवा थांबतील आणि विश्वास अधिक दृढ होईल. लोकशाहीत मौन हे अनेकदा राजकीय धोरण असू शकते, परंतु दीर्घकाळ टिकणारे मौन लोकांच्या मनात संशय निर्माण करते. संशयाला उत्तर देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पारदर्शकता. श्रद्धेचे राजकारण करता येते पण श्रद्धेचा विश्वास टिकवण्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्याचप्रमाणे युवकांच्या भविष्याची भाषा भाषणांतून करता येते, पण त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी निष्पक्ष आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा व्यवस्था उभारावी लागते. देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. प्रश्नांना विरोधकांचा अजेंडा म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांना लोकशाहीच्या आरशात पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो किंवा विद्यार्थ्यांचे भविष्य दोन्हीही पक्षीय राजकारणापलीकडचे विषय आहेत.

देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. कोणत्याही आरोपांचे सत्य न्याय्य, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीतूनच समोर यायला हवे. प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांकडे लोकशाहीच्या आरशातून पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो वा देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, हे दोन्ही विषय पक्षीय राजकारणाच्या पलीकडचे आहेत. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने या मुद्द्यांवर स्पष्ट, ठाम आणि पारदर्शक भूमिका मांडली, तर लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा मौनाचे अर्थ जनता स्वतः लावू लागते. लोकशाहीत सत्तेपेक्षा उत्तरदायित्व मोठे असते आणि जेव्हा उत्तरांपेक्षा मौन अधिक बोलके ठरते, तेव्हा लोकशाहीतील प्रश्न अधिक गंभीर बनतात.



**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# दुष्टचक्रातून कायमची सुटका... अन् पतपात्र शेतकरी !

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सहकार विभाग, बँका यांच्या समन्वयातून अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून कायमची सुटका करण्यासाठी, त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी विविध प्रकारे फायदेशीर अशा तरतुदी शासनाने या योजनेत केल्या आहेत. यापूर्वीच्या लेखात आपण दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा, योजनेला दिलेले विचारपूर्वक असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव, शासनाचा या योजनेमागील दूरदृष्टीकोन पाहिला. आज या योजनेतील अभ्यासपूर्ण अशा तरतुदी पाहुयात.

शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकरी कल्याणाचा ३०० वर्षांपूर्वीचा आदर्श या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकारण्यात येत आहे. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभ ही योजनेची तीन मुख्य स्तंभ आहेत. तब्बल ३६ हजार ५८५ कोटींची राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढणारी ही योजना आहे. यातून थकबाकीदार शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होईल. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान अल्पमुदत पीक कर्ज घेतले. ज्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकबाकी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत राहिली. अशा शेतकऱ्यांना रुपये २ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा थेट लाभ मिळणार आहे. यामध्ये पीक कर्जाचे पुनर्गठित, फेरपुनर्गठित मध्यम मुदत कर्जात रूपांतर झालेल्या खात्यांचाही समावेश असेल.

ज्या शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत घेतलेल्या पीक कर्जाची मुदतीत नियमित परतफेड केली, अशा शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याचीही काळजी सरकारने घेतली आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. पण २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील विहित मुदतीत परतफेड करावी लागणार आहे.

सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले, फेडलेही. प्रत्यक्ष परतफेडीची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास किमान रुपये ५ हजार किंवा प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम प्रोत्साहनपर लाभ म्हणून दिली जाईल, अशाप्रकारे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कामही शासन करत आहे. त्यामुळे वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन मिळेलच.

ज्या शेतकऱ्यांची एकूण थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनी २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम बँकेत जमा केल्यास त्यांना उर्वरित रुपये २ लाखांपर्यंतच्या रकमेचा एकवेळ समझोता () अंतर्गत लाभ मिळणार आहे. बऱ्याचदा कर्ज दोन लाखांपेक्षा थोडे जास्त असते आणि शेतकरी योजनेतून बाहेर पडतो. पण यावेळच्या योजनेत तसे नाही. जर तुमचे कर्ज दोन लाखांहून अधिक असेल, तर वरची अतिरिक्त रक्कम तुम्ही बँकेत भरून या योजनेत सहज सहभागी होऊ शकता. ही रक्कम बँकेत जमा करण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे, ही शेतकऱ्यांना नक्कीच फायद्याची आहे.

ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ चा लाभ घेतला आहे, त्यांना या नवीन योजनेअंतर्गत रुपये ५० हजार मर्यादेपर्यंत कर्जमुक्ती किंवा चा लाभ दिला जाणार आहे, हा पूर्वीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त असा दिलासाच आहे.

या तरतुदी अन् अंमलबजावणीतून लाखो शेतकरी बँकिंग व्यवस्थेत पुन्हा पतपात्र बनतील. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल, ते यातून उभारी घेतील. ही केवळ कर्जमाफी नाही, तर क्षमता बांधणी आहे. तसेच शेती अर्थव्यवस्थेची संरचनात्मक सुधारणा देखील. (क्रमशः)

**– डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

oooooooooooooooooooooo

# बीड भूसंपादन घोटाळ्यातील अतिरिक्त रकमेची वसुली होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग-५२ च्या भूसंपादनात बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी (लवाद) अविनाश पाठक यांनी पदाचा गैरवापर करून चक्क बदली झाल्यानंतर मागील तारखेत आदेश काढत तब्बल २४१ कोटी रुपयांचा महाघोटाळा केल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी विधानसभेत दिली. ६८ कोटी रुपयांचा मूळ निवाडा ३१० कोटींवर नेऊन हा भ्रष्टाचार करण्यात आला. याप्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच वाटप करण्यात आलेल्या रकमेची वसुली केली जाणार असल्याची माहिती मंत्र्यांनी दिली.

आमदार प्रकाश सोळंके, काशिनाथ दाते, राजेश क्षीरसागर, नरेंद्र भोंडेकर, धर्मवीर आत्राम, सुधीर मुनगंटीवार, अमित देशमुख, नितीन पवार आणि मोहन मते यांनी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन वाटपातील गैरव्यवहाराबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूलमंत्र्यांनी या मोठ्या कारवाईबाबत माहिती दिली.

# विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण) लातूर येथे जिल्हास्तरीय कार्यक्रमात घरकुल, सिंचन विहीर ई-मस्टर काढून अंमलबजावणीला प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारने नव्याने केलेल्या विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण) (व्हीबीजी-राम-जी) अधिनियम-२०२५ राज्यात १ जुलै २०२६ पासून लागू झाला आहे. त्यानुसार विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) जिल्ह्यात राबविण्यास प्रारंभ झाला आहे. यानिमित्त लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात जिल्हा परिषद अध्यक्ष उषाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या उपस्थितीत घरकुल, सिंचन विहीर कामाचे ई-मस्टर काढून अंमलबजावणीला सुरुवात झाली.




जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, बांधकाम व आरोग्य सभापती ज्ञानेश्वर बिराजदार, कृषी व पशुसंवर्धन सभपती कविता गोरे, महिला व बालकल्याण सभपती शिवकन्या गोडभरले, रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, विभागीय वन अधिकारी अमितराज जाधव, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दिलीप जाधव, गट विकास अधिकारी संतोष माने यावेळी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) विषयक घडीपुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) या योजनेमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळणार आहे. जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील. यासाठी ग्रामीण भागात योजनेची जनजागृती करण्यासह या अंतर्गत विविध विकास कामे करण्यावर भर दिला जाईल, असे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष उषाताई पाटील यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांचे ग्रामीण भागातील स्थलांतरण थांबविणे आणि त्यांना ग्रामीण भागातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) अंतर्गत प्रयत्न केले जाणार आहेत. या योजनेतून ग्रामीण भागात जलसुरक्षा व जलसंधारणाची कामे, मूलभूत ग्रामीण पायभूत सुविधा, उपजीविका आधारित पायभूत सुविधा आणि आपत्ती प्रतिबंधक कामांवर या योजनेत भर देण्यात येणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात सुविधा निर्मितीला चालना मिळणार आहे. ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा देणारी ही योजना अधिकाधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत, असे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना म्हणाले.

कोणतीही योजना राबविण्यात प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे कर्मचारी यांचे योगदान महत्वाचे आहे. यापूर्वी मनरेगा योजनेच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यात चांगले काम झाले. जलसंधारण, घरकुल व रस्त्यांची कामे झाली. आता विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात विविध विकास कामे राबविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आशिष पावले यांनी योजनेबाबत पीपीटीद्वारे माहिती दिली. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले, तर गट विकास अधिकारी संतोष माने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# हरंगुळ बु. येथे ४ जुलै रोजी संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दिव्यांगासाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळावा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि हरंगुळ (बु.) येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लक्ष्मी नगर, बरड वस्ती, हरंगुळ (बु.), ता. जि. लातूर येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात लातूर येथील साईबाबा जनता सहकारी बँक लि., ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चर प्रा. लि., सुजया एंटरप्रायझेस (जया ह्युंदाई), अजय फार्म मेकॅनायझेशन, राजयोग बजाज, राजयोग ऑटो प्रा. लि., राजयोग मोटर्स एलएलपी, राजर्षी फाउंडेशन, जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. आणि बधिरा गारमेंट या नामांकित आस्थापना प्रामुख्याने सहभागी होणार आहेत. या विविध आस्थापनांमध्ये १८ ते ३५ वर्षे वयोगटातील दिव्यांग उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असणार आहेत. यासाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता १२ वी, कोणतीही पदवी, डिप्लोमा तसेच आय.टी.आय.च्या इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रिशियन, ड्रेस मेकिंग आणि कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेड्सची असणे आवश्यक आहे. इच्छुक आणि पात्र दिव्यांग उमेदवारांनी ४ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता थेट मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, शैक्षणिक बायोडाटा आणि पासपोर्ट साईज फोटो यांच्या प्रत्येकी पाच प्रती (झेरॉक्स) सोबत घेऊन मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

या रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने उमेदवारांना काही अडचण असल्यास, त्यांनी मार्गदर्शन केंद्रातील दत्तात्रय कांबळे (मो. ९०२८२३८४६५), लहू भंडारे (मो. ८०५५९९२९००) आणि प्रवीण वाघमारे (मो. ९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच विशेषतः कर्णबधिर व दिव्यांग उमेदवारांच्या मदतीसाठी सिद्धांत मंडाळे (मो. ९६३७९२०६६५) व आकाश मगर (मो. ८२३७३२०८४९) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन लातूरचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे.

# अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रिया ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने अधिक पारदर्शक व सुलभ करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक पारदर्शक, सुलभ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख करावी. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व जात वैधता प्रमाणपत्रांचे सुरक्षित डिजिटल पडताळणी व्यवस्थेत रूपांतर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५२ व्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ आणि विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जात पडताळणीची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात यावी. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे प्रमाणपत्रांची सुरक्षित पडताळणी व्यवस्था विकसित करावी. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणालीद्वारे दुबार अर्ज, कागदपत्रांची प्राथमिक छाननी आणि पडताळणी अधिक परिणामकारक करावी. आदिवासी, वन व महसूल विभागाने पारधी समाजासाठी संयुक्तरित्या शिबिर राबवून विविध आवश्यक प्रमाणपत्रांचे वितरण करावे. अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी घटक कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत वित्त विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आदिवासी विकास विभागासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक व कल्याणकारी योजनांमधील उत्पन्न मर्यादेचा पुनर्विचार करून अधिकाधिक आदिवासी विद्यार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल यासाठी किमान चार लाख रूपये उत्पन्न मर्यादा करण्याबाबतची कार्यवाही करावी. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी अधिनियमामधील सुधारणा प्रक्रियेला गती देणे. प्रकल्प अधिकारी, रिक्त पदे, न्यायालयीन प्रकरणांसाठी विशेष विधिज्ञांची नियुक्ती आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्याबाबत संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी. आदिवासी विकास विभागामार्फत इतर विभागांना वितरित होणाऱ्या निधीचे प्रभावी नियंत्रण व योजनांचे नियमित मूल्यमापन करण्यासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी वनहक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसह वनसंवर्धन आणि आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी मिशन आधारित उपक्रमांचा आढावा घेतला. धरण क्षेत्रातील मत्स्यव्यवसाय तसेच नव्या योजनांमध्ये स्थानिक आदिवासींना प्राधान्य मिळेल यासाठी विद्यमान धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. बांबू, तेंदूपत्ता, आपटा यांसारख्या लघुवनोत्पादनांवरील ग्रामसभांच्या अधिकारांबाबत विद्यमान धोरणांचा आढावा घेऊन ग्रामविकास व आदिवासी विकास विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रज्ञानाधारित, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासन उभारण्यावर भर देत सामान्य प्रशासन विभाग व आदिवासी विकास विभागाने समन्वयाने काम करून प्रलंबित विषयांची वेळेत पूर्तता करावी. आदिवासी विकास विभागातील रिक्त पदे भरणे, तसेच विविध विभागांकडून आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम नियंत्रण यंत्रणा निर्माण करण्यासाठी सूचना त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांमध्ये अधिक समन्वय साधून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देत, प्रलंबित विषयांवर कालबद्ध कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. तसेच आदिवासी नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने मिळावा, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# टीईटी पेपर फूट प्रकरण : महाराष्ट्र पोलिसांची बिहारमध्ये धडक : हाजिपूरमध्ये कॅफेवर छापेमारी

पाटणा : महाराष्ट्रात ऊएऊ झरजी थ्ीवब झाल्यानं मोठी खळबल उडाली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र पोलिसांनी बिहारमधून तीन आरोपींना पकडलं आहे. त्यामुळे प्रकरणाचा कसून तपास महाराष्ट्र पोलीस करत आहेत. त्यात आता महाराष्ट्र एसटीएफ आणि वैशाली पोलिसांनी ऊएऊ पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. वैशाली पोलिसांच्या मदतीनं, ठाणे पोलिसांनी बुधवारी रात्री हाजीपूरमधील कचहरी रोडवर असलेल्या एका सायबर कॅफेवर छापा टाकला. या पथकानं रात्रभर कॅफमध्ये तपास केला, अशी माहिती वैशाली पोलिसांनी दिली आहे.

टीईटी पेपरफुटी प्रकरणी वैशालीमध्ये छापेमारी : वैशाली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ''पहाटे १ वाजेपर्यंत चाललेल्या या छाप्यानंतर एसटीएफच्या पथकानं कॅफे मालक सोनू कुमारसह तिघांना ताब्यात घेतलं. महाराष्ट्र एसटीएफचं पथक सध्या या तिघांची चौकशी करत आहे. रात्रभर ठाणे पोलीस आणि वैशाली पोलिसांची पथक कचहरी रोडवरील सायबर कॅफेबाहेर तैनात होती.

महाराष्ट्र पोलिसांना सापडले महत्त्वाचे पुरावे : पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यात महाराष्ट्र एसटीएफच्या पथकाला अनेक डिजिटल पुरावे सापडले आहेत. या पुराव्याची सखोल तपासणी केली जाईल. या कारवाईनंतर, महाराष्ट्र पोलिसांच्या अधिकाऱ्यानं सांगितलं की, ''महाराष्ट्र टीईटी पेपरफुटीशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यात आली आहे.''

काय म्हणाला अटक केलेल्या आरोपीचा भाऊ ? : अटक करण्यात आलेल्या सोनूचा मोठा भाऊ जितेंद्र कुमार यानं सांगितलं की, ''सोनू बुधवारी संध्याकाळी गाव सोडून हाजीपूरला गेला होता. मात्र तो तिथं पोहोचला नाही आणि घरीही परतला नाही. सोनू फोन उचलत नसल्याचं त्याच्या पत्नीनं कळवलं. रात्रभर त्याचा शोध घेण्यात आला, परंतु तो सापडला नाही.''

समस्तीपूरच्या बिजेंद्र गुप्ताशी आहे कनेक्टेड : सहदेई येथील रहिवासी असलेला सोनू २००९ पासून हाजीपूरमध्ये सायबर कॅफे चालवत आहे. त्याचे संबंध समस्तीपूरचा रहिवासी आणि पेपरफुटी प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असलेल्या बिजेंद्र गुप्ताशी आहेत. यापूर्वी, महाराष्ट्रात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींच्या चौकशीदरम्यान सोनूचा धाकटा भाऊ विकास याचं नाव समोर आलं होतं. या माहितीमुळेच पोलीस पाटण्यातील सायबर कॅफेपर्यंत पोहोचले, अशी माहिती वैशाली पोलीस सूत्रांनी दिली आहे.

पेपरफुटीनंतर पोलिसांनी भिवंडीमध्ये छापेमारी केली. त्यातून या प्रकरणाचे बिहार आणि हरियाणात धागेदोरे असल्याचं स्पष्ट झालं. त्यानुसार बिहारमधून आणि हरियाणातून आरोपींना अटक करण्यात आलं. आरोपींच्या चौकशीतून बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यातील बिजेंदर गुप्ताचं नाव समोर आलं. तेव्हापासून महाराष्ट्र एसटीएफ (एऊइ) पथक विविध राज्यांमध्ये छापेमारी करत आहे.बिजेंद्र गुप्ताच्या शोधात महाराष्ट्र एसटीएफ पथक बिहारमध्येही दाखल झालं. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य सूत्रधाराचा शोध घेत असताना हे पथक समस्तीपूरमधील त्याच्या घरी तळ ठोकून आहे.

# अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार

## १०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर

**मुंबई/प्रतिनिधी :** गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.




सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली.

नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली.

या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## लातूर शहरात नवीन नगर भूमापन कार्यालय कार्यान्वित

**लातूर/प्रतिनिधी :**लातूर शहरातील नागरिकांना नगर भूमापन विषयक सेवा अधिक सुलभ आणि जलद गतीने उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. लातूर येथील जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या अधिपत्याखाली शहरात नवीन नगर भूमापन कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

हे नवीन कार्यालय खोरी गल्ली, सिल्वर ज्युब्ली रोडवरील मणियार बिल्डिंग येथे १५ जून २०२६ पासून कार्यान्वित झाले असून, नागरिकांसाठी सर्व प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या नवीन कार्यालयामार्फत आता लातूर शहरातील नगर भूमापन, मालमत्ता नोंदी, वारस हक्क नोंदी, जमिनींचे व मालमत्तांचे नकाशे, मोजणी तसेच इतर सर्व संबंधित शासकीय कामकाज हाताळले जाणार आहे. त्यामुळे लातूर मूळ गावभाग व शहरातील नागरिकांनी आपल्या नगर भूमापन विषयक कामांसाठी आणि चौकशीसाठी खोरी गल्ली येथील नवीन नगर भूमापन अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे नगर भूमापन अधिकारी अशोक द. चव्हाण यांनी केले आहे.

## अमृततर्फे संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा (पूर्व) परीक्षा -२०२६ उत्तीर्ण उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी अर्थसहाय्य

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, अमृतच्या लक्षित गटातील (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहारणा, कानबी, इत्यादी) उमेदवारांना संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य (सन २०२६-२७) योजना राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ मध्ये (युपीएससी) नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२६ उत्तीर्ण झालेल्या आणि आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी संबंधितांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा. अर्ज सादर करण्यापूर्वी सूचनांचे पालन करावे. या योजनेविषयी भविष्यातील सर्व माहिती/सूचना केवळ अमृतच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील. योजनेच्या अधिक माहितीसाठी व ऑनलाइन अर्ज भरण्यासंबंधी काही शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा.

या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये फक्त व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये फक्त इतके प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाइन/संकेतस्थळावर अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १७ जुलै, २०२६ आहे. अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, मयुरेश्वर अपार्टमेंट, पितृछाया बिल्डिंग, पहिला मजला, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर (भ्रमणध्वनी: ७३९१०६५४७०) येथे संपर्क साधावा.

## लातूर जिल्हा परिषदेत कृषि दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** हरितक्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ०१ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषदेचा कृषि विभाग, आत्मा प्रकल्प संचालक यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात कृषि दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

याप्रसंगी लातूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, कृषि, पशुसंवर्धन व दुग्ध विकास समितीच्या सभापती कविता गोरे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती शिवकन्या गोडभरले, जि.प. सदस्य माणिक गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, विभागीय कृषि सहसंचालक महेश तीर्थकर आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिलीप जाधव यांसह इतर अधिकारी, कर्मचारी व जिल्ह्यातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी दीपक सुपेकर यांनी कृषि दिनाचे महत्त्व विशद करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी तयार करण्यात आलेल्या कृषि सेवा केंद्रनिहाय खत उपलब्धता क्यूआर कोड आणि फवारणी करताना घ्यावयाची काळजी या विषयांवरील घडीपत्रिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राज्य व जिल्हास्तरावर विविध पिकांचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या जिल्ह्यातील प्रगतशील शेतकऱ्यांचा शाल, आंब्याचे रोप व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तर लातूर कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ संदीप देशमुख यांनी खरीप पिकांचे योग्य व्यवस्थापन व पेरणी संदर्भात आणि कृषि महाविद्यालयाचे कृषि विद्यावेत्ता वसंत सूर्यवंशी यांनी सध्याच्या हवामानातील बदल, अल निनोचा शेतीवर होणारा प्रभाव व त्यावर करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थित शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, सभापती कविता गोरे आणि जि.प. सदस्य माणिक गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून ग्रामीण भागातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत शेतीविषयक माहिती, आधुनिक तंत्रज्ञान आणि हवामानाचा अंदाज पोहोचवण्याचे आवाहन करत सर्व शेतकरी बांधवांना कृषि दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मिलिंद बिडबाग यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# आ. अभिमन्यू पवार यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद सूर्यवंशी पाटील यांची ५५ दंडवत यात्रा; आई जगदंबेच्या चरणी दीर्घायुष्य व अखंड यशासाठी घातले साकडे

**लातूर/प्रतिनिधी :** आमदार अभिमन्यू पवार यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, निरोगी आयुष्य आणि अखंड यशासाठी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद धनराज सूर्यवंशी पाटील यांनी अत्यंत श्रद्धा, भक्तिभाव आणि समर्पणातून अनोखी ५५ दंडवत यात्रा काढून समाजासमोर श्रद्धेचा आदर्श ठेवला.

खाडगाव रोडवरील सूर्यवंशी निवास येथून या दंडवत यात्रेला प्रारंभ झाला. स्वतःच्या घरापासून ते लातूरच्या गजबळलेल्या परिसरात असलेल्या आई जगदंबा मंदिर, गंजगोलाई येथे पोहोचेपर्यंत गोविंद धनराज सूर्यवंशी पाटील यांनी ५५



दंडवत घेत श्रद्धेने आणि भक्तिभावाने मार्गक्रमण केले. ही यात्रा खाडगाव रोड, दयानंद गेट, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गांधी चौक, हनुमान चौक मार्गे गंजगोलाईपर्यंत पार पडली. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी या आगळ्यावेगळ्या भक्तिमय उपक्रमाचे कौतुक केले. अनेकांनी यात्रेचे दर्शन घेत गोविंद सूर्यवंशी पाटील यांच्या श्रद्धेला सलाम केला.

सकाळी ९.०० वाजता आई जगदंबा मंदिरात महाआरती मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाली. यावेळी गोविंद धनराज सूर्यवंशी पाटील यांनी आई जगदंबेच्या चरणी आमदार अभिमन्यू पवार यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, निरंतर जनसेवेची शक्ती आणि जीवनात अखंड यश लाभावे, अशी मनोभावे प्रार्थना केली.

या पवित्र आणि भावनिक सोहळ्याला आमदार अभिमन्यू पवार यांच्या पत्नी यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी आई जगदंबेचे दर्शन घेऊन महाआरतीत सहभाग नोंदविला तसेच आपल्या पतींना निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्य लाभावे, अशी भक्तिभावाने प्रार्थना केली. त्यांच्या उपस्थितीमुळे या धार्मिक कार्यक्रमाला अधिक भावनिक आणि मंगलमय स्वरूप प्राप्त झाले.

गोविंद धनराज सूर्यवंशी पाटील यांनी केलेली ही ५५ दंडवत यात्रा ही केवळ वाढदिवसाचा उत्सव नसून श्रद्धा, निष्ठा, संस्कृती आणि जनप्रतिनिधीप्रती असलेल्या आत्मीयतेचे प्रतीक असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या अनोख्या उपक्रमामुळे वाढदिवसाचे औचित्य भक्तिमय वातावरणात साजरे झाले असून सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी लातूर आतील भाजपचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# पुनर्रचित फळपिक विमा योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** मृग बहार २०२६-२७ मध्ये लातूर जिल्ह्यात डाळींब, लिंबू, पेरू, सिताफळ आणि चिकू या फळपिकांसाठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना राबविली जाणार आहे. ही योजना बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लि., पुणे यांच्यामार्फत कार्यान्वित होईल. शासनाच्या महावेध प्रकल्पांतर्गत हवामान केंद्रांवर नोंदविलेल्या माहितीनुसार सहभागी शेतकऱ्यांना परस्पर नुकसान भरपाई मिळेल.

अधिसूचित फळपिके आणि महसूल मंडळे

डाळींब: किनगाव, अहमदपूर, खंडाळी, नागलगाव, हेर, औसा, लामजना, किनीथोट, किल्लारी, बेलकुंड, भादा, चाकूर, नळेगाव, वडवळ ना., निलंगा, औराद शहाजानी, कारेपूर, पानगाव.

चिकू: अहमदपूर.

पेरू : अहमदपूर, खंडाळी, शिरूर ताजबंद, हाडोळती, मातोळा, उजनी, बेलकुंड, लामजना, किल्लारी, घोणसी, जळकोट, मुरुड बु.

लिंबू : हेर.

सिताफळ: शिरूर ताजबंद, उजनी, बेलकुंड, आष्टा, औराद शहाजानी, रेणापूर, पळशी, पोहरेगाव, पानगाव, कारेपूर, हरंगूळ बु., कन्हेरी, मुरुड बु.

विमा संरक्षित रक्कम आणि हप्ता

डाळींब: ₹१,६०,०००/- (हप्ता ₹८,०००/-)

चिकू, पेरू, सिताफळ: प्रत्येकी ₹७०,०००/- (हप्ता ₹३,५००/-)

लिंबू : ₹ ८०,०००/- (हप्ता : ₹४०००/-)

अर्जाची अंतिम मुदत

डाळींब: १४ जुलै २०२६

चिकू व लिंबू : १५ जुलै २०२६

पेरू : १४ जुलै २०२६

सिताफळ: ३१ जुलै २०२६

अर्ज प्रक्रिया

कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी बँकेत घोषणापत्र आणि अर्ज सादर करावा. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी www.pmfby.gov.in वर ऑनलाइन नोंदणी करावी. अर्जासोबत आधार कार्ड, सातबारा, ८ (अ) उतारा, फळबागेचा - फोटो, भाडेपट्टा करार (आवश्यक असल्यास), आणि बँक पासबुक प्रत सादर करणे बंधनकारक आहे. ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आय.डी.) अनिवार्य आहे. शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र तातडीने काढण्याचे आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी टोल-फ्री क्रमांक १८०० २०९ ५९५९ वर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्जांमधील त्रुटी पूर्ण करण्यासाठी ५ जुलै पर्यंत अंतिम मुदत

**लातूर/प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत प्रलंबित अर्जांमधील त्रुटी दूर करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ५ जुलै २०२६ पर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थी लाभापासून वंचित राहतील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

शासन निर्णय क्रमांक बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२ (दिनांक २६/१२/२०२६) अन्वये सुधारणा करण्यात आलेली ही योजना २०१७ पासून राबविली जात आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना व अटी-शर्ती शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सध्या महा-आयटी पोर्टलवर एकूण ४५० विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटीपूर्ततेसाठी विद्यार्थी लॉगिनवर (सेंट बँक) प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. या संदर्भात समाज कल्याण कार्यालयामार्फत संबंधित विद्यार्थ्यांना वेळोवेळी दूरध्वनीवरून तसेच भ्रमणध्वनीवर संदेश पाठवून त्रुटी पूर्ण करण्याबाबत अवगत करण्यात आले आहे. ०१ जुलै २०२६ रोजी देखील विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा अंतिम संदेश पाठविण्यात आला आहे. विद्यार्थी लॉगिनवर प्रलंबित असलेल्या अर्जांवर कार्यालयाकडून कोणतीही पुढील कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे त्रुटी वेळेत न सुधारल्यास अर्ज रद्द होऊ शकतो. परिणामी विद्यार्थ्याचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाल्यास समाज कल्याण कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी तात्काळ आपापल्या लॉगिनवर जाऊन आवश्यक कागदपत्रांची व त्रुटींची पूर्तता करावी आणि आपले ऑनलाईन अर्ज ०५ जुलै २०२६ पूर्वी कार्यालयाच्या लॉगिनवर सादर करावेत, असे जाहीर आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## २४ वर्षांनी यजमान अमेरिकेनं जिंकला सामना; राऊंड ऑफ १६ स्थान पक्कं

नवी दिल्ली: यजमान अमेरिकेनं फिफा विश्वचषक २०२६ च्या १६ संघांच्या फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. २ जुलै रोजी सकाळी, अमेरिकेच्या संघानं ३२ संघांच्या फेरीत बोस्निया आणि हर्झेगोविनाचा सामना केला आणि २-० च्या फरकानं सामन्यात विजय मिळवला. यासह आतापर्यंत एकूण १० संघांनी पुढील फेरीत आपलं स्थान निश्चित केलं आहे. बोस्निया आणि हर्झे गोविनाविरुद्धचा ३२ संघांच्या फेरीतील विजय अमेरिकेसाठी विशेष आहे, कारण २००२ च्या फिफा विश्वचषकानंतरचा हा त्यांचा पहिलाच बाद फेरीतील विजय आहे. बोस्निया आणि हर्झेगोविनाविरुद्धच्या सामन्यात अमेरिकेनं सुरुवातीपासूनच दबाव कायम ठेवला, पहिल्या हाफच्या ४५ व्या मिनिटाला फोलारिन बालोगुननं अमेरिकेसाठी गोल करुन त्यांना १-० अशी आघाडी मिळवून दिली.

# सम्राट मित्रमंडळाच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त शहरातील डॉक्टरांचा गौरव

**अहमदपूर/प्रतिनिधी :** डॉक्टर्स डे निमित्त समाजसेवेसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांचा सम्राट मित्रमंडळ-लातूर, अहमदपूर यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत उगीले हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागरगोजे, डॉ. उबेद जागीरदार, डॉ. जोशी, डॉ. मधुसूदन चेरेकर, डॉ. चलवदे, डॉ. अमृत चिवडे, डॉ. प्रवीण जगताप, डॉ. बेंबडे, डॉ. राजकुमार, डॉ. खडके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सम्राट मित्रमंडळाचे संयोजक तथा युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत, समाजाच्या आरोग्यसेवेसाठी दिवस-रात्र कार्य करणाऱ्या डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी डॉ. मधुसूदन चेरेकर व डॉ. नागरगोजे



यांनी मनोगत व्यक्त करत, डॉक्टरांविषयी समाजात वाढत असलेला विश्वास आणि आरोग्यसेवेतील जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. उपस्थित डॉक्टरांनी अशा उपक्रमांचे कौतुक करून सम्राट मित्रमंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष गायकवाड यांनी केले, तर सचिन बानाटे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद पठाण, आकाश पवार, अजय भालेराव तसेच सम्राट मित्रमंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरूडकर व नागनाथ भालेराव सेवानिवृत्त

### सेवा गौरव सोहळ्याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी व कोषाध्यक्ष संजय बोरा यांच्या शुभ हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर जवळपास ३५ वर्षाच्या व शिक्षकेत्तर कर्मचारी नागनाथ भालेराव ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि.३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त महाविद्यालयात आयोजित सेवा गौरव सोहळ्याप्रसंगी त्यांचा दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी व कोषाध्यक्ष संजय बोरा यांच्या शुभ हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.यावेळी संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सत्कारमूर्ती पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,सौ.



अंजली वरूडकर आणि सत्कारमूर्ती नागनाथ भालेराव,सौ.भालेराव, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी असे म्हणाले की,आज विज्ञान व तंत्रज्ञान आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सला अनन्यसाधारण असे महत्त्व असून शिक्षकांनी हाडाचा शिक्षक बनून सक्षम विद्यार्थी घडविले पाहिजेत.समाजोपयोगी व राष्ट्र विकासासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे सांगण्याबरोबर त्यांना सेवापूर्तीनिमित्त भावी आयुष्यासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले, डॉ.हेमंत वरूडकर हे सच्चे मित्र, आदर्श शिष्य व उत्तम सहकारी आहेत.तसेच नागनाथ भालेराव हेही प्रामाणिकपणे काम करणारे शिक्षकेत्तर कर्मचारी होते अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी दयानंद परिवारामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकांचे वेगळे स्टेटस असून दयानंद शिक्षण संस्था मातृसंस्था आहे असे ते म्हणाले.सत्कारमूर्ती डॉ.हेमंत वरूडकर यांनी वैयक्तिक शैक्षणिक जीवनाचा आढावा घेत दयानंद शिक्षण संस्था ही आई असून या संस्थेमुळेच मी घडलो असे त्यांनी मनोगतातून व्यक्त केले. नागनाथ भालेराव यांनी संस्थेप्रती ऋण व्यक्त केले.

प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी केले तर आभार डॉ.महेश बेंबडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.यावेळी सुरूची भोजनाचाही सर्वांनी आस्वाद घेतला.याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.